# कथा तुझी ही व्यथा!!

जीवनाची आस तू, जगण्याचा विश्वास तू ।
माणसाला मिळालेलं एक खरोखरी वरदान तू ॥

अन्न, वस्त्र, निवाऱ्यापेक्षा, गरज मूलभूत जरी ।
महत्त्व नाही जाणिले तुझे, आम्ही लेकरांनी तरी ॥

तुझ्या असण्यानसण्यावर अवलंबून उद्याचा उषःकाल ।
काळजी न घेता तुझी नीट, उगवेल माणसाचा दुष्काळ ॥

जल, पाणी, जीवन, होय तूच तो आभाळाच्या अंकुर ।
बचत तुझी करावी तरीही का माणसाची ही कुरकुर ॥

कोण चूक कोण बरोबर प्रश्न हा उरतच नाही ।
उद्याच्या पिढीच्या भविष्यकाळा ही जबाबदारी आपल्या डोही ॥

चला तर सगळे पाणी जिरवू, साठवू, वाचवू ।
निसर्गाच्या ह्या अनमोल ठेव्याचे आदरातिथ्य राखू ॥

→ स्वप्ना जोशी